सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com | E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२३६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. १७ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थितीत नायब सिंह सैनी यांनी घेतली हरीयाणाच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ

### १४ आमदारांनी घेतली कॅबिनेट आणि राज्यमंत्रीपदाची शपथ




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७चंदीगड**

हरीयाणामध्ये नवे सरकार स्थापन झाले आहे. नायब सिंह सैनी हे पुन्हा हरीयाणाच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले आहे. गुरुवारी नायब सिंह सैनी यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. पंचकुला येथील दशहरा मैदानात हा शपथविधीचा कार्यक्रम झाला. सैनी यांच्या शपथविधी सोहळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह, राजनाथ सिंह, जे. पी. नड्डा यांच्यासह अनेक मंत्री उपस्थित होते. याशिवाय, भाजपाशासित राज्यांचे अनेक मुख्यमंत्रीही या सोहळ्याला उपस्थित होते.

नायब सिंह सैनी यांच्यासह १४ आमदारांनी कॅबिनेट आणि राज्यमंत्रीपदाची शपथ घेतली. अनिल विज यांनी मंत्रीपदाची दुसऱ्यांदा शपथ घेतली. तसेच, यावेळी दोन महिला आमदारांनीही मंत्रीपदाची शपथ घेतली. केंद्रीय मंत्री इंद्रजीत राव सिंह यांची मुलगी आरती राव आणि माजी मुख्यमंत्री चौधरी बन्सीलाल यांची नात व तोशाम मतदारसंघाच्या आमदार श्रुती चौधरी यांनीही मंत्रीपदाची शपथ घेतली.

दरम्यान, हरयाणात गेली १० वर्षे सत्तेत असलेल्या भाजपने यावेळी पूर्ण बहुमताने सरकार स्थापन केले आहे. भाजपने ४८ जागा जिंकल्या आहेत, तर काँग्रेसने ३७ जागा जिंकल्या आहेत.याशिवाय, दोन जागा इंडियन नॅशनल लोकदलाच्या खात्यात गेल्या आहेत.

**'या' नेत्यांना मिळाले मंत्रिमंडळात स्थान**

अनिल विज, कृष्ण लाल पंवार, विपुल गोयल, राव नरवीर सिंह, महिपाल ढांडा, श्रुति चौधरी, अरविंद शर्मा, श्याम सिंह राणा, रणबीर गंगवा, कृष्ण बेदी, गौरव गौतम, आरती राव, राजेश नागर यांना हरयाणा सरकारच्या नवीन मंत्रिमंडळात स्थान मिळाल्याचे सांगितले जात आहे.

## १७ वर्षांपासून साथ, पण विधानसभेच्या तोंडावर सहकाऱ्याने फिरवली पाठ; रवी राणांना मोठा धक्का

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. महाराष्ट्रात २० नोव्हेंबरला मतदान होणार असून २३ नोव्हेंबरला निकाल जाहीर होणार आहेत. आचारसंहिता लागू होताच राज्यातील राजकारणाला वेग आला आहे. यातच आता पक्षांतराचे प्रमाणही वाढताना दिसत आहे. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर पक्ष बदलणाऱ्यांची संख्या वाढू शकते, अशी चर्चा आहे. यातच आता आमदार रवी राणा यांना ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर धक्का बसला असून, विश्वासू सहकाऱ्याने साथ सोडल्याचे सांगितले जात आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाचे मुख्य प्रवक्त्याने संघटनेचा राजीनामा देण्याच्या तयारी आहेत. ते रवी राणा यांचे अंत्यत विश्वासू आणि निकटवर्तीय असल्याचे मानले जातात. गेल्या १७ वर्षांपासून युवा स्वाभिमान संघटनेसोबत काम करत आहेत. रवी राणा यांचे निकटवर्तीय म्हणून ते कायमच सक्रीय असायचे. मात्र, ऐन विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर राजीनामा देण्याची तयारी केल्याने हा रवी राणा यांना मोठा धक्का बसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

**मला जबाबदारीतून मुक्त करा**

आमदार रवी राणा हे युवा स्वाभिमान संघटनेचे अध्यक्ष आहे. युवा स्वाभिमान पक्षाचे मुख्य प्रवक्ते जितू दुधाने यांनी रवी राणांची साथ सोडण्याची तयारी केली आहे. युवा स्वाभिमान संघटनेत माझी घुसमट होत आहे. त्यामुळे मला जबाबदारीतून मुक्त करा, असे ते म्हणालेत. जितू दुधाने यांच्या या भूमिकेमागील नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. जितू दुधाने आता कोणता झेंडा हाती घेतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, विधानसभा निवडणुकांची घोषणा होताच आता इनकमिंग आऊटगोईंगला सुरुवात झाली आहे. सध्या महायुतीतून अनेक नेते, पदाधिकारी हे महाविकास आघाडीत प्रवेश करत आहेत. तर दुसरीकडे महाविकास आघाडीतील काही नेते, पदाधिकारी महायुतीत प्रवेश करताना पाहायला मिळत आहेत. लोकसभा निवडणुकीत नवनीत राणा यांचा पराभव झाला होता.

## नांदेड लोकसभेच्या पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसकडून रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ नांदेड**

खासदार वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या नांदेड लोकसभा मतदारसंघातील जागेसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. तसेच महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीबरोबरच २० नोव्हेंबर रोजी नांदेड लोकसभेच्या जागेसाठी मतदान होणार आहे. दरम्यान, नांदेड लोकसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसने उमेदवार घोषित केला असून, दिवंगत खासदार वसंतराव चव्हाण यांचे सुपुत्र रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

काँग्रेसचे खासदार वसंतराव चव्हाण यांचं २६ ऑगस्ट रोजी अल्पशा आजारानं निधन झालं होतं. वसंतराव चव्हाण यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा पराभव केला होता. मात्र ही निवडणूक आटोपल्यानंतर काही काळानंतर त्यांच्या प्रकृतीबाबत समस्या निर्माण झाली होती. त्यानंतर त्यांना उपचारांसाठी हैदराबाद येते नेण्यात आले होते. मात्र तिथेच त्यांचं निधन झालं होतं.




## संपादकीय ......

# निवडणुकांचे बिगुल

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका कधी होणार, याचा 'सस्पेन्स' अखेर संपला. २० नोव्हेंबरला एकाच टप्प्यात निवडणूक घेतली जाईल व २३ नोव्हेंबरला निकालही लागेल, अशी घोषणा निवडणूक आयोगाने केल्याने रणधुमाळी खर्या अर्थाने सुरू झाली आहे. गेल्या पाच वर्षांत राज्यातील राजकारणात इतके नाट्य निर्माण झाले होते की, जनतेला धक्क्यांमागून धक्के बसले! २०१९ मध्ये ज्या शिवसेनेने भाजपबरोबर निवडणुका लढवल्या, त्याच्याशीच काडीमोड घेऊन, ज्यांच्याशी वर्षानुवर्षे संघर्ष केला, त्या काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर बोलणी सुरू केली. हा जनादेशाचा उघड अवमान होता. त्यामुळे विरोधकांच्या या डावपेचांवर मात करण्यासाठी भाजपने राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांच्यासमवेत सरकार स्थापन केले; पण ते लगेच कोसळले आणि राज्याच्या राजकारणात विविध हिकमती करण्यात तरबेज असलेल्या शरद पवार यांच्या प्रेरणेने महाविकास आघाडी सरकार स्थापन झाले. अडीच वर्षांतच शिंदे राज्याचे मुख्यमंत्री बनले. त्यांच्या नेतृत्वाखालील महायुतीचे सरकार थोड्याच दिवसांत पडेल, अशी भाकिते मविआच्या नेत्यांनी वर्तवली; पण राष्ट्रवादी काँग्रेसमधील अजित पवार गटास बरोबर घेऊन, महायुतीचे सरकार अधिकच भक्कम झाले; मात्र या सर्व प्रक्रियेत राजकीय पक्षांनी मतदारांशी प्रतारणा केली वा मतदारांना गृहीत धरले. विचारसरणीशी तडजोडी करण्यात येऊन, त्याचेही समर्थन चलाखीने करण्यात येऊ लागले.आता २० नोव्हेंबरला निवडणुका होणार असून, मतदारांचा कौल कोणत्या दिशेला, हे २३ नोव्हेंबरला स्पष्ट होईल. अर्थात, महाराष्ट्रासमवेत झारखंडच्याही निवडणुका होणार असून, त्या मात्र १३ आणि २० नोव्हेंबर अशा दोन टप्प्यांत होणार आहेत. थोडे इतिहासात डोकावले, तर लक्षात येईल की, १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले आणि दोनच वर्षांत राज्यात विधानसभेची निवडणूक घेण्यात आली. १९५६ ते १९६० या चार वर्षांमध्ये यशवंतराव चव्हाण मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री होते. त१ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार झाले आणि यशवंतराव चव्हाणच राज्याचे पहिले मुख्यमंत्री बनले. १९६२ मध्ये राज्य विधानसभेच्या २६४ मतदारसंघांसाठी (आता विधानसभेचे संख्याबळ २८८ आहे.) निवडणुका झाल्या. या निवडणुकीत काँग्रेसने सर्व २६४ जागा लढवल्या आणि त्यांपैकी २१५ जिंकून एकतर्फी बहुमत प्राप्त केले. काँग्रेसनंतर दुसर्या क्रमांकावर असणार्या शेकापकडे फक्त १५ जागा होत्या. राज्यात युती किंवा आघाडीचीच सरकारे येऊ लागली. १९९० ते १९९९ पर्यंत काँग्रेस विरुद्ध भाजप-शिवसेना अशी लढत असे.

शेतकरी कामगार पक्ष, जनता दल, डावे पक्ष सुरुवातीच्या काळात सक्रिय होते. १९९९ ते २०१९ पर्यंत काँग्रेस-राष्ट्रवादी विरुद्ध भाजप-शिवसेना असाच सामना होता; पण २०१९ नंतर राज्याचे राजकारण पूर्णपणे उलटेपालटे झाले आहे. चार प्रमुख पक्षांऐवजी सहा पक्ष मैदानात आहेत. याखेरीज मनसे, वंचित बहुजन आघाडी, एमआयएम आणि शिवाय तिसरी आघाडी असे अनेक खेळाडू रिंगणात असल्यामुळे मतांमध्ये फूट होणार हे स्पष्ट आहे. शिवाय निवडणुकीच्या मुहूर्तावर पक्षांतरे सुरू असून, त्यामुळे कोण विजयी होईल आणि कोण पराभूत, याचा अंदाज करणे कठीण. नुकत्याच जम्मू-काश्मीर आणि हरियाणाच्या निवडणुका पूर्णपणे हिंसाचारमुक्त वातावरणात पार पडल्या. महाराष्ट्र व झारखंडमधील निवडणुकाही तशाच होतील, अशी आशा आहे. ईव्हीएमच्या गैरवापराविषयीच्या तक्रारींचे सडेतोड व तपशीलवार उत्तर मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी दिले असून, तरीही यावेळी झारखंड वा महाराष्ट्रात शंकेखोरांना शंका घेण्याची उबळ येईल, हे नक्की! मतदान ज्या दिवशी आहे, तो बुधवार असल्यामुळे जोडून सुट्ट्या घेऊन पर्यटनाचा आनंद लुटावा, असा प्रयत्न होणार नाही.

निवडणुकीच्या काळात दारू वा पैशाचे वाटप केले जाते म्हणून आंतरराज्यीय सीमांवर कडक तपासणी केली जाणार आहे; पण तरीही लोकसभा निवडणुकीवेळी आमिषे दाखवण्याचे प्रकार झालेच होते. मुंबई-पुण्यासारख्या शहरांत कमी मतदान होत असते. ते वाढवण्याचे आव्हान या निवडणुकीतही असेल. घरी बसून राजकारण्यांवर समाजमाध्यमांतून शेरेबाजी करणार्यांनी यावेळी तरी मतदानाचे आपले कर्तव्य पार पाडावे, अशी अपेक्षा आहे. अर्थात, ही निवडणूक महायुती-महाविकास आघाडीबरोबरच तिसर्या आघाडीची आणि मतदारांचीही कसोटी घेणारी आहे, हे स्पष्टच आहे. महाराष्ट्रासोबत झारखंड विधानसभेची निवडणूकही होत आहे. या राज्यातील निम्मे जिल्हे नक्षलग्रस्त असून, त्याचा विचार करूनच तेथे दोन टप्प्यांत निवडणुका होत आहेत. दोन्ही राज्यांतील निवडणुकांची मतमोजणी एकाच दिवशी २३ नोव्हेंबरला होईल. झारखंडमध्ये हेमंत सोरेन यांच्या 'झामुमो'च्या नेतृत्वाखालील आघाडी सरकार आहे. सोरेन यांना ईडीने अटक करून जेलमध्ये टाकल्यानंतर त्यांच्या जागी चंपई सोरेन मुख्यमंत्रिपदी विराजमान झाले; पण सुटका झाल्यानंतर पुन्हा हेमंत यांनीच मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतल्यामुळे नाराज झालेल्या चंपई यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. झामुमो सरकारच्या विरोधात जनमत असल्याचे सांगण्यात येत होते; पण लोकसभा निवडणुकीत तेथे इंडिया आघाडीने लोकसभेच्या पाच जागा मिळवल्या. २०१९ मध्ये झामुमोच्या नेतृत्वाखालील आघाडीला केवळ दोन जागा मिळाल्या होत्या. झामुमो आघाडीचा सफाया होईल, असे सांगितले जात होते; मात्र तसे काही घडले नाही. हेमंत सोरेन यांच्यावर झालेल्या कारवाईमुळे उलट त्यांच्याबाबत सहानुभूती निर्माण झाली. आता विधानसभा निवडणुकीतही भाजप हा हेमंत यांचा पराभव करतो का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# आचारसंहिता आणि मतदार



**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक**

आज लागणार, उद्या लागणार अशी गेले महिनाभर चर्चा असलेली महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता एकदाची लागू झाली आणि प्रत्यक्ष लढाईला आता तोंड फुटले आहे. आचारसंहिता लागल्याबरोबर काही नेत्यांनी शंखनाद, अखेरची लढाई, आरपारची लढाई अशा आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. आचारसंहिता लागू झाल्यानंतर साधारणतः ३५ दिवसांत निवडणुका होत असतात. अर्ज भरणे, मागे घेणे, कुणाला मागे घेण्यास भाग पाडणे, पक्षाचे एबी फॉर्म मिळणे, प्रत्यक्ष उमेदवारी जाहीर होणे, त्यानंतर धूमशान प्रचार आणि नंतर निवडणुका. निवडणुका झाल्या की, निकाल लागत असतात. कुठे गुलाल उधळला जातो, तर कुणाच्या बंगल्यावर सामसूम असते. आपण सामान्य लोकांना या सर्व प्रक्रियेशी फारसे देणेघेणे नसते. या कालावधीमध्ये निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे उमेदवारांचे आचरण असणे अपेक्षित असते. मतदारांना लालूच दाखवून मतदान करून घेणे या गोष्टी या काळात करता येत नाहीत; कारण आदर्श आचारसंहिता लागू असते.

नेते, लोकप्रतिनिधी दिसले की, इतके दिवस तुम्ही वाकून नमस्कार करत होता आणि नेते हात उंचावून तुमच्या नमस्काराचा स्वीकार करत होते. आता मजा आहे तुमची. आता नेते वाकून नमस्कार करतील आणि तुम्ही हात उंचावून त्यांच्या अभिवादनाचा स्वीकार कराल; मात्र लक्षात ठेवा की, हा कालावधी फक्त ३५ दिवसांचा आहे. उरलेले ३६५ गुणिले पाच वर्षे इतके दिवस तुम्हालाच वाकून नमस्कार करणे भाग आहे. एकदा का निवडून आले की, तुमचा-आमचा म्हणजे मतदारांचा आणि राजकीय नेत्यांचा काहीही संबंध राहत नाही. आपल्या वॉर्डातील नगरसेवकापासून ते थेट आमदार, खासदार आणि असंख्य उमेदवार आता सोशल मीडियावरून तुम्हाला साद घालण्याचा प्रयत्न करतील. त्यानंतर ते क्वचित तुमच्या घरी येऊन घरातील वडीलधार्या लोकांच्या पाया पडतील, मुलाबाळांच्या डोक्यांवरून हात फिरवतील. तुम्ही अजिबात भारावून जाऊ नका; कारण यानंतर पाच वर्षांनंतरच ते तुमच्या घरी येणार असतात.

आपल्याला सहजासहजी न भेटणारा आपल्या वॉर्डातील नगरसेवकही आता तुम्हाला वाकून नमस्कार करणार आहे, तुमच्या घरी येणार आहे. आमदारकीच्या इलेक्शनला ज्याच्या वॉर्डातून भरपूर मतदान मिळेल, त्यालाच पुढे नगरपालिकेच्या निवडणुकांवेळी पक्षाचे तिकीट मिळणार असते. म्हणजे पाहा, किती लोकांचे कर्तृत्व निवडणुकीत पणाला लागलेले असते. गेली वर्षानुवर्षे आचारसंहिता भंगाचे गुन्हे दाखल केले जातात आणि पुढे त्याचे काय होते, हे अद्याप कुणालाच माहीत नाही. आचारसंहिता भंग केल्यामुळे कुणी जेलमध्ये गेल्याचे ऐकिवात नाही. मग हे गुन्हे नोंदवतात तरी कशाला? एकदा गुन्हा नोंदवायचा म्हटले की, पोलिसांना त्याची तक्रार लिहून घ्यावी लागते. तिथे कागद वाया जातात. हे कागद पुढे सरकत त्यावर आणखी काही कागद येऊन ते कागद पण वाया जातात. त्यामुळे आता सर्वांनी आदर्श आचरसंहितेचे पालन करणे आता सर्वांची जबाबदारी आहे.




## अस्थमा रुग्णांची दिनचर्या कशी असावी?



**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक**

अस्थमा हा फार मोठा आजार नाही. श्वासोच्छ्वासाच्या मार्गात काहीतरी अडथळा निर्माण होऊन श्वासोच्छ्वास करण्यासाठी कठीण होणे म्हणजे दमा उसळणे होय. दमा उसळला की रुग्णाला धाप लागते. उथळ व जलद श्वासोच्छ्वास सुरू होतो. अस्थमा या जीर्ण श्वास विकारात अधूनमधून धाप लागते. विशेषत: उच्छवासास त्रास होतो. याचा हल्ला एकाएकी सुरू होतो. पाच मिनिटांपूर्वी बर्या स्थितीत असलेल्या माणसाला एकाएकी धाप सुरू होते. श्वास वाहिन्याचे स्नायू एकाएकी आकुंचित झाल्याने व त्यांचे अस्तर सुजल्याने ही लक्षणे सुरू होतात. श्वासोच्छ्वासासाठी त्याला उच्छवास करण्यास लागणार्या सर्व स्नायूंची मदत घ्यावी लागते. खोकला येतो व छातीत सू सू आवाज सुरू होतो. अवघ्या काही तासांपासून तर काही दिवसांपर्यंत हा आवेग टिकू शकतो. तसेच तो परत कसा उद्भवेल याचाही नेम नसतो.

दम्याच्या रुग्णांनी अशी ठेवावी दिनचर्या

रोज सकाळी वमन करावे. तसेच आपल्या शरीराची व तोंडाची स्वच्छता करावी.

मिठाच्या पाण्याने गुळण्या कराव्यात. प्राणायाम, लंग व्हायटलायझरच्या साहाय्याने श्वासोच्छ्वासाचा व्यायाम करावा. योगासने करावीत.

सकाळ, सायंकाळ डॉक्टरांनी दिलेली औषधे नियमित घ्यावीत.

रात्री झोपताना गरम पाण्यात १५ ते २० मिनिटे पाय बुडवून बसावे.

नाकाची स्वच्छता राखावी.

प्रत्येक जेवणानंतर दात घासावे व जीभ स्वच्छ करावी.

धुम्रपान करू नये.

उग्र दर्प असलेल्या वस्तूपासून दूर राहावे.

अधिक धावू नये, त्याऐवजी हळूहळू चालावे.

ॲस्पिरिनयुक्त औषधे पोटात घेऊ नये.

दारू, थंड पेय, तळीव पदार्थ, आंबट पदार्थांचे सेवन कधीच करू नये.

दिवसातून अधिकाधिक पाणी प्यावे.

रात्रीचे जेवण मात्र हलके घ्यावे व ते सूर्यास्तापूर्वी करावे.

# हरभरा पिकातील येणार्‍या रोगांपासून बचाव करण्यासाठी पेरणी अगोदर करा हे काम

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक**

हरभरा हेपीक महाराष्ट्र, मध्यप्रदेश, राजस्थान, गुजरात, आंध्रप्रदेश व कर्नाटक या राज्यात घेतले जाते. राज्याचे कडधान्याचे क्षेत्र ४३.९९ लक्ष हेक्टर असून, उत्पादन ४१.२३ लक्ष टन व उत्पादकता ९३७ किलो प्रति हेक्टर एवढी आहे

हरभरा हे डाळवर्गीय पीक असल्यामुळे या पिकांच्या मुळावरील ग्रंथीतील रायझोबियम जीवाणूमार्फत हवेतील १२०-१३० किलो नत्र/हेक्टरी शोषून त्याचे मुळावरील ग्रंथीमध्ये स्थिरीकरण केले जाते यामुळे जमिनीचा पोत टिकून राहण्यास मदत होते. तसेच जमिनीची सुपीकता वाढते.बीजप्रक्रिया कीटकनाशक फवारणीच्या खर्चात बचत होते. योग्य प्रक्रिया केलेले बियाणे पेरल्याने कमी

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

अथवा जास्त ओलाव्यातही पीक एकसारखे येते. बीजप्रक्रिया केल्यामुळे पिकांची रोगप्रतिकार शक्ती वाढते, पीक जोमदार येते, जमिनीत नत्राचे स्थिरीकरण होते व जमिनीतील अपायकारक जिवाणूंपासून पिकाचे संरक्षण होते.

**बीजप्रक्रिया-** १) मर, मूळकूज किंवा मानकूज या रोगांपासून नियंत्रण करण्यासाठी पेरणीपूर्वी ट्रायकोडर्मा बुरशीनाशकाची ५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास प्रक्रिया करावी अथवा कार्बेन्डॅझिम २५% + मॅन्कोझेब ५०% डब्लूएस या संयुक्त बुरशीनाशकाची ३ ग्रॅम/किलो या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी.




२) पेरणीपूर्व २-५ किलो/एकर ट्रायकोडर्मा पावडर शेणखतात किंवा गांडूळखतामध्ये मिसळून जमिनीत टाकावी.

**जिवाणू संवर्धके वापरण्याची पद्धत-** १) रायझोबियम व स्फुरद उपलब्ध करणारी जीवाणू संवर्धके प्रत्येकी २५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास वापरावी.

२) प्रथम १२५ ग्रॅम गूळ प्रति लिटर गरम पाण्यात विरघळून घ्यावा. थंड द्रावणात २५० ग्रॅम प्रत्येक जिवाणू संवर्धन एकत्र करावे. १० किलो बियाण्यास हे मिश्रण पुरेसे आहे.

३) बियाणे ताडपत्री, फरशी किंवा प्लॅस्टिकवर घेऊन संपूर्ण बियाण्यावर आवरण होईल याप्रमाणे मिसळावे.

४) असे बियाणे सावलीत वाळवावे व त्यानंतर पेरणीसाठी वापरावे. ५) यामुळे हरभर्‍याच्या मुळावरील ग्रंथींचे प्रमाण वाढून हवेतील नत्र अधिक प्रमाणात शोषून घेऊन पिकास उपलब्ध केला जातो.

# मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांची मनपा शाळांना आकस्मिक भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७ अमरावती-** सचिन कलंत्रे आयुक्त तथा प्रशासक महानगरपालिका अमरावती यांची मनपा मराठी शाळा क्रमांक १३ चपराशी पुरा, मनपा उर्दू शाळा क्रमांक ६ चपराशी पुरा, मनपा हिंदी शाळा क्रमांक ६ फ्रेजरपुरा ,मनपा मराठी कन्या शाळा क्रमांक ६ फ्रेजरपुरा व मनपा उर्दू शाळा क्रमांक ५ फ्रेजरपुरा अशा एकूण सहा शाळांना आकस्मिक भेट देण्यात आली. या भेटीदरम्यान माननीय आयुक्त तथा प्रशासक यांनी सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांशी शैक्षणिक विषयांवर हितगुज साधले, मनपा शाळांना पुरविण्यात आलेल्या डिजिटल साहित्यांची पाहणी केली तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती बाबत आढावा घेतला त्याचप्रमाणे सर्व शाळांमधील मुख्याध्यापक व शिक्षकांशी संवाद साधून शैक्षणिक गुणवत्ता व शाळांसाठी आवश्यक भौतिक सोयी सुविधा बाबत सविस्तर चर्चा केली.



# महाराष्ट्रासह देशातून पाऊस परतला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७ अमरावती-** परतीचा पाऊस महाराष्ट्राच्या प्रवेशद्वारा जवळच म्हणजे नंदुरबार जिल्ह्यात दि.१४ ऑक्टोबरपर्यंत दहा दिवस मुक्काम ठोकून होता. परंतु, मंगळवार दि.१५ ऑक्टोबरला मात्र, मान्सून (परतीच्या पावसा) ने, महाराष्ट्राबरोबर सीमावर्ती मध्यप्रदेश, दक्षिण छत्तीसगड, पूर्व ओरिसा, तेलंगणा, उत्तर कर्नाटक राज्यातून व संपूर्ण देशातून एका दिवसात निरोप घेतला.

म्हणजे परतीचा पाऊस महाराष्ट्रात प्रवेश करतो-ना-करतो, तोच एका दिवसात तो महाराष्ट्रातून निघूनही गेला. थोडक्यात महाराष्ट्रात परतीचा पाऊस हा केवळ एका दिवसाठीच महाराष्ट्राला स्पर्श करून गेला असेच म्हणावे लागेल.

परतीच्या पावसाने एका दिवसातच का माघार घेतली?

दक्षिणेकडील चार राज्याच्या भागात म्हणजे दक्षिण कर्नाटक, रायलसीमा, पाँडिचेरी, काराईकल, तामिळनाडू केरळ या भागात, बं. उपसागरातून वाहणाऱ्या बळकट वेगवान पूर्वीय वाऱ्यांच्या वातावरणीय प्रणाल्यातून गेल्या आठवड्यापासून तेथे ईशान्य मोसमी पूर्व भरपूर पाऊस पडतच होता. तेथील या प्रणाल्यांच्या रेट्यातूनच, महाराष्ट्रा बरोबर, सीमावर्ती मध्यप्रदेश, दक्षिण छत्तीसगड, पूर्व ओरिसा, तेलंगणा, उत्तर कर्नाटकसहित राज्यातून व संपूर्ण देशातूनच आज दि. १५ ऑक्टोबरला परतीच्या पावसा (मान्सून) ने एका दिवसात हनुमान-उडी घेतली.

दि.१५ ऑक्टोबर पासूनच त्या चार राज्याच्या भागात आता नैरूक्त मान्सूनचे, ईशान्य मान्सून मध्ये रूपांतर झाले, म्हणजेच पुढील तीन




महिन्यासाठी तेथील चार राज्यात नैरूक्त मान्सूनोत्तर हिवाळी पावसात म्हणजेच ईशान्य मान्सून चे तेथे आगमनच झाले असेच समजावे. महाराष्ट्रातही ह्यापुढे तीन महिने होणाऱ्या पावसाला ईशान्य मान्सून किंवा हिवाळी पाऊस म्हणूनच संबोधले जाते.

ऑक्टोबर महिन्यातील शेवटच्या आठवड्यातील दि.२२ ते २६ ऑक्टोबर दरम्यानचे पावसाचे दुसरे आवर्तन त्याच्या नियोजित तारखेऐवजी ६ दिवस अगोदर म्हणजे दि.१६ ते २३ ऑक्टोबर दरम्यान संपूर्ण महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी किरकोळ पावसाची शक्यता जाणवते. त्यातही विशेषतः खालील २४ जिल्ह्यात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता जाणवते.

परंतु सध्या तेथे सध्या चालु असलेल्या शेतकामासाठी या पावसाची विशेष भिती बाळगू नये, असेही वाटते. विशेषतः मुंबई शहर, उपनगर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर या २४ जिल्ह्यात पावसाची शक्यता अधिक जाणवते.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. १७ ऑक्टोबर २०२४ शहर/ग्रामिण


# देवेंद्र फडणवीस हेच महायुतीचा मजबूत चेहरा - आ.रवी राणा

## भाजपचे भारतीय बंधू कटप्पाच्या भूमिकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती–** भाजप नेते देवेंद्र फडणवीस हेच महायुतीचा मजबूत चेहरा आहेत. सर्वाधिक आमदार असतानाही त्यांनी मोठा त्याग करून उपमुख्यमंत्रीपद स्विकारले, अशी भावना अपक्ष आमदार रवी राणा यांनी बुधवारी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर व्यक्त केली आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विधानसभा निवडणुकीत मोठा त्याग करण्याची तयारी दर्शवण्याचे आवाहन केल्याची माहिती आहे. त्यानंतर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही याविषयी महत्त्वाचे संकेत दिलेत. या पार्श्वभूमीवर रवी राणा यांनी भाजप नेतृत्वताच्या सुरात सूर मिसळत उपरोक्त भावना व्यक्त केली आहे. रवी राणा म्हणाले, सर्वाधिक आमदार असतानाही देवेंद्र फडणवीस यांनी मोठा त्याग करून उपमुख्यमंत्रीपद स्विकारले. भाजपने त्यात करून एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री केले. ही गोष्ट स्वतः शिंदे यांनाही माहिती आहे. महायुतीमध्ये सर्वात मजबूत चेहरा म्हणून फडणवीस यांच्याकडे पाहिले जाते. किंबहुना एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपदाची संधी देणे, हा त्याग त्यांनी करून दाखवला आहे.

**भजापचे भारतीय बंधू कटप्पाच्या भूमिकेत–** रवी राणा यांनी यावेळी आपल्या पत्नी तथा माजी खासदार नवनीत राणा यांच्या लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाचे कारणही यावेळी सांगितले. ते म्हणाले, ज्यांनी भाजपचे कार्यालय उघडेल त्यांनीच लोकसभा निवडणुकीत नवनीत राणा यांच्याविरोधात काम केले. भाजप आमदार श्रीकांत भारतीय व त्यांचे बंधू तुषार भारतीय हे कटप्पाच्या भूमिकेत आहेत. त्यांनी भाजप सोबत बंडखोरी केली. त्यामुळे या दोघांवरही कारवाई झाली



पाहिजे. रवी राणा यांनी यावेळी महायुतीकडे आपल्या बडनेरा मतदारसंघ अचलपूर, दर्यापूर, मेळघाट या ३ मतदारसंघाचीही मागणी केली.

अमित शहा यांनी भाजप–शिवसेनेच्या एका बैठकीत एकनाथ शिंदे यांना त्याग करण्याची तयारी ठेवण्याची सूचना केल्याची माहिती आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, त्या बैठकीत अमित शहा म्हणाले की, शिंदेजी, मुख्यमंत्रीपदावेळी आम्ही त्याग केला. आता तुम्ही आम्हाला झुकते माप द्या. या देशात पंतप्रधान, मुख्यमंत्री व तहसीलदार अशी काही महत्त्वाची पदे आहेत. बाकी गृहमंत्र्यांसह सर्व पदे केवळ व्यवस्था आहेत. कामे पूर्ण होण्यासाठी केलेली ही व्यवस्था आहे आम्ही तुम्हाला मुख्यमंत्रीपद दिले. तुमच्यासाठी आमच्या माणसांना त्याग करावा लागला. त्यामुळे जागावाटपात मित्रपक्षांना झुकते माप द्या.

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही यासंबंधी अमित शहा यांची री ओढली होती. ते म्हणाले होते, एकनाथ शिंदे आणि अमित शाह यांचे काय बोलणे झाले, हे मला माहिती नाही. पण मुख्यमंत्रीपद हे प्रमुख असते. सरकार त्यांच्या नावे असते. आपण एकनाथ शिंदे सरकार म्हणतो. म्हणूनच आमचाही आग्रह आहे, की एवढा मोठा पक्ष आहे, आमचे इतके आमदार आहेत. आम्हालाही त्यांना सांभाळावे लागते. दोन गोष्टी आम्हाला जास्त मिळाव्यात. काही समित्या, महामंडळे मिळायला हवीत. संख्याबळानुसार एकनाथ शिंदेंनी आमच्याही पाठी उभे राहिले पाहिजे असा आमचा आग्रह आहे.

दुसरीकडे, अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसही महायुतीच्याच माध्यमातून विधानसभा निवडणूक लढवणार आहे. त्यामुळे अजित पवार यांना सत्तेत सहभागी होताना जो शब्द देण्यात आला होता, तो शब्द भाजप पाळणार असल्याची माहिती आहे. यामुळेच स्वतः अमित शहा यांनी जागावाटपात सक्रीय भूमिका घेतली आहे.

## पहिली ग भुलाबाई देवा देवा.. भुलाबाईचा सण उत्साहात साजरा

### पहिली ग भुलाबाई देवा देवा साजे गाण्यांनी वेधले लक्ष



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अचलपूर / तळेगाव ठाकूर –** घराच्या अंगणात पडलेला स्वच्छ चंद्र प्रकाश , केलेली सजावट काही ठिकाणी ओल्या धांड्यांनी उभारलेली खोपडी , मुलींची सुरू असलेली , तेथे थाटात बसवलेली भुलाबाईची मूर्ती , मुलींचे सुरेल आवाजात उमटणारी गाणी अशा उत्सवात व जोशात मुलींनी व महिलांनी

तिवसा तालुक्यातीळ तळेगाव ठाकूर गावात आणिअचलपूर येथे बुधवारी रात्री या सणाची सांगता केली

पहिली ग भुलाबाई देवा देवा , कारल्याचं बी पेरलं ,यादवरा आणि रुसून बैसली कैसी आदी स्तुतीपर गाणी मुलींनी एकमेकींच्या घरी जाऊन म्हटली शेवटी आरती म्हणण्यात आली रात्री उशिरापर्यंत हा कार्यक्रम सुरू होता.

भुलाबाई हा लोक कथेतील एक महोत्सव आहे हा महोत्सव भाद्रपदाच्या पौर्णिमेपासून ते शरद पौर्णिमेपर्यंत असा एक महिन्याच्या कालावधीत साजराहोतो गणपतीच्या आगमनानंतर भुलजा – भुलाबाई येतात मुली हा भुलाबाई महोत्सव साजरा करतात.भुलाबाईहा लोककथागीत महोत्सव होय.

हा महोत्सव भाद्रपदाच्या पौर्णिमे पासून ते शरद पोर्णिमेपर्यंत असा एक महिन्याच्या कालावधीत होतो. गणपतीच्या आगमनानंतर भुलजा–भुलाबाईयेतात. विशेषता शरद पौर्णिमेला हा महोत्सव शहरासह ग्रामीण भागात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

## ओव्हरलोड नव्हे राखेच्या रिकाम्या वाहनांवर कार्यवाही करा

### गावकऱ्यांची मागणी,रिकाम्या वाहनांतून उडणारी राख धोकादायक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७नांदगाव पेठ–** गत तीन दिवसांपासून प्रादेशिक परिवहन विभागाने राखेच्या ओव्हरलोड वाहनांवर कार्यवाहीचा धडाका सुरू केला आहे मात्र गावकऱ्यांना ओव्हरलोड वाहनांचा त्रास नसून वाहनांमधून राख खाली केल्यानंतर भरधाव जाणारे रिकामी वाहने ही महामार्गावरून राख उडवत जाते त्यामुळे प्रादेशिक परिवहन विभागाने अश्या वाहनांवर कार्यवाही करावी अशी मागणी नांदगाव पेठ सह परिसरातील नागरिकांनी केली आहे. रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पातून दररोज लाखो टन राखेची वाहतूक करण्यात येते. ज्या वाहनांमधून या राखेची वाहतूक करण्यात येते.वाहनांमध्ये राख भरल्यानंतर त्यावर पाणी टाकले जाते व त्या वाहनांवर कापडाने संरक्षण करून नंतर ती वाहने महामार्गावरून वीटभट्टी किंवा अन्य ठिकाणी जातात.मागणी असलेल्या ठिकाणी राखेचे वितरण झाल्यानंतर रिकामी वाहने महामार्गावरून सुसाट निघतात मात्र रिकाम्या वाहनांतून उडणारी



### रेतीच्या ओव्हरलोड वाहनांकडे दुर्लक्ष

जिल्ह्यात रेतीच्या अवैध आणि ओव्हरलोड वाहतुकीने डोके वर काढले आहे. मध्यरात्री रेतीच्या वाहनांचा थरार अनेकांनी अनुभवला मात्र त्यावेळी साखरझोपेत असणाऱ्या प्रादेशिक परिवहन विभागाने या प्रकाराकडे कधीही लक्ष दिले नाही.रेतीच्या ओव्हरलोड वाहनांकडे सुद्धा प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

राख ही मागून येणाऱ्या वाहनचालकांच्या डोळ्यात शिरून मोठे अपघात होण्याची दाट शक्यता असते शिवाय या केमिकलयुक्त राखेमुळे महामार्गावर असलेल्या गावातील नागरिकांचे आरोग्य देखील धोक्यात आले आहे. याबाबत प्रादेशिक परिवहन विभागाने ओव्हरलोड वाहनांवर कार्यवाहीचा सपाटा लावला परंतु गावकऱ्यांची मागणी ही वेगळी आहे.प्रादेशिक परिवहन विभागाने रतन इंडिया भोवती डेरा टाकला असून गावकऱ्यांना ज्या उडणाऱ्या राखेचा त्रास होतोय त्यावर अद्याप कोणत्याही प्रकारची कार्यवाहीकरण्यात आलेली नाही. तीन दिवसांच्या कार्यवाहीनंतर महामार्गावर अनेक राखेचे वाहने सुसाट धावत होती आणि राख नागरिकांच्या व चालकांच्या डोळ्यात उडत होती. यावर ठोस कार्यवाही होणे गरजेचे असून प्रादेशिक परिवहन विभागाने या गंभीर प्रकाराकडे लक्ष देणे तेवढेच महत्वाचे आहे.

## जिल्ह्यातील १२ बाजार समित्यांना दिलासा

### घटणारे उत्पन्न वाचले, बाजार समित्यांचा सेसचा निर्णय 'जैसे थे'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती –** खरेदीदार व्यापाऱ्यांकडून वसूल करण्यात येणाऱ्या सेस संदर्भातील अधिसूचना चारच दिवसांत सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने परत घेतली आहे. राज्य बाजार समिती सहकारी संघाने या अधिसुचनेवर घेतलेल्या तीव्र आक्षेप नोदवला होता. – त्यामुळे बाजार समित्यांमार्फत आकारण्यात येणारा सेस जैसे थे ठेवण्याची नवीन अधिसूचना काढण्यात आल्याने बाजार समित्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. परिणामतः बाजार समित्यांचे घटणारे उत्पन्न वाचले आहे. राज्य सरकारच्या सहकार, पणनव वस्त्रोद्योग विभागाने १० ऑक्टोबरला अधिसूचना जारी करून बाजार समितींमार्फत आकारण्यात येणारा सेस निम्म्याने घटविला होता. त्यानुसार ७५ व १०० पैशांऐवजी २५ पैसे व पन्नास पैसे दर आकारण्याची सूचना लागू करण्यात आली होती. यामुळे बाजार समितींचे निम्मे उत्पन्न घटणार होते. या अधिसुचनेचा थेट लाभ खरेदीदार – व्यापाऱ्यांना होणार होता. राज्य सरकारच्या १० ऑक्टोबरच्या अधिसुचनेवर राज्य बाजार समिती – सहकारी संघाने तीव्र आक्षेप घेत न्यायालयात जाण्याची तयारी चालविली होती. त्यापूर्वीच सहकार, न पणन व वस्त्रोद्योग विभागाने मंगळवारी नवीन अधिसूचना जारी करीत बाजार समितींना ७५ पैसे व १०० पैसे सेस आकारण्याची मुभा दिली आहे. चार दिवसांत राज्य सरकारला अधिसूचना दुरुस्त करून नवीन काढण्याची नामुष्की आली आहे. राज्यात ३०६ कृषी उत्पन्न



बाजार समिती असून त्यांचे वार्षिक उत्पन्न ९०० कोटी रुपयांच्या जवळपास आहे. १० ऑक्टोबरच्या अधिसुचनेमुळे या बाजार समितींचे उत्पन्न घटून ४५० कोटींवर आले असते. या उत्पन्नातून ४५ टक्के आस्थापना खर्च, पाच टक्के शासनाचे सुपरव्हीजन शुल्क, पाच

टक्के कृषी पणन मंडळाचे अंशदान सेसमधून द्यावा लागतो. बाजार समितीमधील विकासकामे व शेतकऱ्यांसाठी पूरक सोयी– सुविधांवरील खर्च करावा लागतो. त्यामुळे घटलेल्या उत्पन्नात हा खर्च करणे अशक्य झाले असते. महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाने या मुद्द्यावर सरकारची कोंडी केली. त्यांच्या दबावापुढे झुकत १० ऑक्टोबरची अधिसूचना मागे घेत नव्याने अधिसूचना काढून जुने दर कायम ठेवण्याची वेळ आली आहे. दरम्यान या नविन अधिसुचनेमुळे बाजार समितीचे घटणारे उत्पन्न मात्र वाचले आहे.

### राज्य शासनाने निर्णय मागे घेतला



राज्य सरकाने सेस कमी करण्याचा घेतलेल्या निर्णयच मुळात चुकीचा होता. एकट्या अमरावती बाजार समितीचा विचार केल्यास सुमारे आठ कोटींचे नुकसान बाजार समितीचे झाले असते. त्यामुळे बाजार समितीचे आर्थिक गणितच बिघडणार होते. संचालक मंडळाने या अधिसूचनेविरोधात कठोर भूमिका घेतल्याने शासनाने सेस कमी करण्याचा निर्णय मागे घेतला आहे.

**हरीश मोरे, सभापती, कृउबास, अमरावती.**

## उद्याला गुरुकुंजात भव्य रक्तदान शिबिर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ गुरुकुंज मोझरी–** श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालाच्या राष्ट्रीय सेवा योजना व रॅनबो बल्डबँक नागपूर यांच्या सयुंक्त विद्यमाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५६ व्या पुण्यतिथी निमित्य भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दि.१८ आक्टोंबर रोजी सकाळी १० वाजता रक्तदान शिबिराला श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालय गुरुकुंज आश्रम येथे आयोजित केले





आहे. रक्तदान शिबिराला रक्तदात्यांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मुरलिधर खारोडे यांनी केले आहे.

## निवडणुकीतील प्रत्येक टप्प्याची काळजीपूर्वक कार्यवाही करावी

### – जिल्हाधिकारी सौरभ कटियार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि१७ अमरावती–** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक एकाच टप्प्यात होणार असल्याने सर्व मतदारसंघांत एकाचवेळी कार्यवाही करावी लागणार आहे. प्रामुख्याने उमेदवारी अर्ज, मतदान आणि मतमोजणी या निवडणुकीच्या टप्प्यावर सर्व यंत्रणांनी काळजीपूर्वक कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आगामी विधानसभा निवडणुकीबाबत बैठक घेण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसिलदार उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. कटियार म्हणाले, गेल्या निवडणुकीमधील त्रृटी यावेळी होणार नाही, याची दक्षता घ्यावी. या त्रृटी दूर करण्यासाठी



निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अधिक लक्ष द्यावे. प्रामुख्याने एकूण मतदानाच्या आकडेवारीमध्ये विसंगती दिसून येते. त्यामुळे मतदान पथकाला सदर मतदानाची एकूण संख्या कळविताना अचूक कळविण्या बाबत सूचना देण्यात याव्यात. तसेच डाटा तयार करताना अचूक आकडेवारी देण्यासाठी जबाबदार पथक नेमण्यात यावे. ही आकडेवारी परत तपासून पहावी. यावेळी निवडणूक आदेशासोबत टपाली मत पत्रिका राहणार आहे. त्यामुळे आयोगाच्या निर्देशा प्रमाणे कर्तव्यावरील अधिकारी , कर्मचारी यांना टपाली मत पत्रिका उपलब्ध करून देण्यात याव्यात. दिव्यांग आणि ८५ वर्षे वयाच्या नागरिकांना घरून मतदानाचा पर्याय दिला आहे. त्यामुळे सर्व नागरिकांना टपाली मतपत्रिका उपलब्ध व्हाव्यात, यासाठी प्रयत्न करण्यात यावे. नागरिकांकडून मतदारयादीत नाव नसल्याच्या तक्रारी येतात. त्यामुळे सध्या स्थितीत नाव नोंदणी करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती देण्यात यावी. तसेच नाव नोंदणीसाठी आलेले अर्ज तातडीने निकाली काढण्यात यावे. अर्जाबाबत शंका असल्यास बीएलओ मार्फत स्थळ पाहणी करून या बाबत निर्णय घेण्यात यावा. मतदारां मध्ये जनजागृती करण्या साठी मतदान चिठ्ठी पोहोचविणे महत्वाचे आहे. त्यामुळे सर्व मतदारांपर्यंत मतदार चिठ्ठी देण्यात यावी. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विविध सामाजिक संस्थांचा सहभाग घेण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी यांनी दिले.

# मतदार ओळखपत्र वाटणाऱ्या बीएलओंवर राहणार करडी नजर

## कामात हयगय केल्याचे लक्षात आल्यास करणार कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि१७ अमरावती–** मतदार ओळखपत्र वाटणाऱ्या बीएलओंवर (मतदान केंद्रस्तरीय अधिकारी) यंदा जिल्हा निवडणूक विभागाची करडी नजर राहणार असून त्यांनी खरेच ओळखपत्र मतदारांपर्यंत पोहोचवले की, नाही याची शहानिशा विविध यंत्रणांमार्फत केली जाईल. त्यामुळे मतदारांना मतदान केंद्र क्रमांक, नावाचा क्रम तसेच मतदान केंद्र नेमके कोणते,



याबाबत तत्काळ माहिती मिळणार आहे.ओळखपत्र पोहोचवण्याची जबाबदारी असलेल्या बीएलओंनी यावेळी कामात हयगय केल्याचे उघड झाल्यास त्यांच्याविरोधात कारवाई केली जाईल, असे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी स्पष्ट केले आहे. निवडणुकीच्या वेळी कामात येणारे मतदार ओळखपत्र लोकसभा निवडणुकीच्या वेळी जिल्ह्यातील बहुतांश मतदारांपर्यंत पोहोचले नव्हते. त्यावेळी ओळखपत्र पोहोचवण्याची जबाबदारी बीएलओंकडे सोपवण्यात आली होती. परंतु, त्यांनी त्यावेळी ओळखपत्र व्यवस्थित पोहोचवले नव्हते. मोठ्या संख्येत मतदार ओळखपत्राच्या प्रतिक्षेत होते.अशा प्रकारांचा मतदानावर विपरित परिणाम होतो. ते बघता अशा प्रकारे कामात हयगय खपवून घेतली जाणार नाही. मतदारांना ओळखपत्र वेळेवर मिळाले तर त्याचा मतदाराच्या टक्केवारीवरही चांगला परिणाम दिसून येतो. याबाबत जिल्हा निवडणूक विभागाची खात्री पटल्यामुळे यावेळी त्यांनी बीएलओंना कामचुकारपणा करण्याची कोणतीही संधी न देण्यासाठी यंत्रणा कामाला लावण्याचा निर्णय घेतला आहे.

# अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या कर्जाची सोडतीद्वारे निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती,**
साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या सुविधा कर्ज योजनेंतर्गत लाभार्थ्यांची निवड सोडतीद्वारे करण्यात आली. योजनेतील ५ पाच लाख रुपये आणि महिला समृद्धी योजनेंतर्गत प्रकल्प मर्यादा १ लाख ४० हजार रुपये आहे. लाभार्थी निवड समितीने सुविधा कर्ज योजनेचे १४५ कर्ज मागणी अर्ज पात्र केले असून महिला समृद्धी योजनेंतर्गत ६३ कर्ज मागणी अर्ज पात्र ठरले आहेत. लाभार्थ्यांची चिठ्ठीद्वारे निवड निवासी उपजिल्हाधिकारी तथा





लाभार्थी निवड समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर घ्यारे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली.

बैठकीमध्ये सुविधा कर्ज योजनमध्ये ५० कर्ज प्रस्तावाचे उद्दिष्ट असून यात १४५ पात्र अर्जामध्ये ९२ पुरुष आणि ५३ महिला आहे. त्यापैकी ३० पुरुष व २० महिला असे एकुण ५० लाभार्थ्यांची सोडतीद्वारे निवड करण्यात आली. महिला समृद्धी कर्ज योजनमध्ये ४० कर्ज प्रस्तावाचे उद्दिष्ट असून ६३ पात्र अर्जांपैकी ४० महिला लाभार्थ्यांची सोडतीद्वारे निवड करण्यात आली. यावेळी निवड समितीचे सदस्य तथा समाजकल्याण सहाय्यक आयुक्त राजेंद्र जाधवर, जिल्हा व्यवस्थापक तथा सदस्य सचिव जगदीश गाभणे उपस्थित होते.

# रविवारला यवतमाळ येथे शिक्षक समितीची राज्य कार्यकारीणी सभा

## ३५ जिल्हाचे पदाधिकारी उपस्थित राहणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि१७अमरावती–** महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीची राज्य कार्यकारीणी सभा रविवार दि. २०ऑक्टोबर रोजी सहकार भवन, आर्णी रोड, यवतमाळ जि. यवतमाळ येथे सकाळी ठीक ११ वाजता महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे विजय कोंबे (राज्याध्यक्ष) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेली आहे.या सभेला ३५जिल्हाचे राज्य पदाधिकारी,विभागीय,जिल्हा पदाधिकारी उपस्थित राहणार आहे. या सभेमध्ये मागील सभा दि. २३ जून २०२४ च्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे, ३० सप्टेंबर २०२४ अखेरचा हिशोब वाचून मंजुरी घेणे,जिल्हावार सभासद नोंदणी आढावा, कामकाज अहवाल सादर करणे, अधिवेशन घेऊन निवडलेल्या





नुतन जिल्हा शाखांना मंजुरी देणे.राज्य संघटना कामकाज आढावा देणे.अध्यक्षांचे परवानगीने आयत्या वेळी येणारे विषय.तसेच सन २०१९, २०२१, २०२३ आणि २०२४ चा सभासद नोंदणी हिशोब,अधिवेशन हिशोब अद्याप ज्यांनी दिला नाही अशा शाखानी हिशोब यादी,काऊंटर स्लीप सहित आणावा, मागील तीन महिन्याचा कार्य अहवाल सभा सुरु होण्यासपूर्वी सादर करावा, ज्या शाखांचा कार्यकाळ संपला त्या शाखांनी अधिवेशन नियोजन सभा सुरु होण्यापूर्वी द्यावे. राज्याध्यक्ष यांनी पाठवलेले सातही प्रपत्र दोन प्रतीत सोबत आणणे अनिवार्य आहे. सभासद नोंदणीची २०२४ ची शिल्लक पावती पुस्तके जमा करावी.शासना सोबत केलेला पत्र व्यवहार आणि चर्चा याबाबत माहीती आणि निर्णय घेण्यात येणार आहे.या सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर,शिक्षक नेते उदय शिंदे,राज्य सल्लागार विजयकुमार पंडित ,महादेव पाटील माळवदक, यांनी केले असल्याचे असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.–

# राज्यस्तरावर जिल्हा परिषद गर्ल्स हायस्कूल सन्मानित

## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर अभियानात विभागातून प्रथम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती**
मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान टप्पा क्र. २ या उपक्रमाचा शालेय शिक्षण विभाग मार्फत नुकताच निकाल घोषित करण्यात आला. यामध्ये शासकीय शाळा गटात जिल्हा परिषद गर्ल्स हायस्कूल अमरावती या शाळेने विभागस्तरीय प्रथम क्रमांक पटकाविला. नुकताच मुंबई येथे आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते या शाळेतील मुख्याध्यापक धनंजय वानखडे व ईतर शिक्षक वृंदाना सन्मानित करण्यात आले.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान टप्पा क्र. २ मध्ये पायाभूत सुविधा, शासन ध्येय धोरण अंमलबजावणी आणि शैक्षणिक संपादणूक करीता १५० गुणांचे परीक्षण करण्यात आले. या स्पर्धेत सहभागी शाळांचे केंद्रस्तर, तालुकास्तर, जिल्हा स्तर, विभागस्तर आणि राज्यस्तरीय समिती कडून मुल्यांकन करण्यान आले. मागील आठवड्यात शालेय शिक्षण विभागद्वारा स्पर्धेचे निकाल जाहिर करण्यात आले. यामध्ये जिल्हा परिषद गर्ल्स हायस्कूल अमरावती या शाळेला विभाग स्तरावर प्रथम क्रमांक मिळाला.

जमशेदजी टाटा थिएटर नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, शिक्षणमंत्री दिपक केसरकर, प्रधान शिक्षण सचिव श्रीमती कुंदन, शिक्षण आयुक्त सुरज मांढरे, उपसंचालक डॉ.शिवलिंग पटवे, आदींच्या प्रमुख उपस्थितीत शिक्षणाधिकारी (माध्य) प्रिया देशमुख, मुख्याध्यापक तथा गटशिक्षणाधिकारी धनंजय वानखडे, विस्तार अधिकारी संदीप बोडखे , केंद्रप्रमुख अनिल डाखोडेसह शाळेतील शिक्षक वृंदांना विभागीय प्रथम क्रमांकच्या ट्रॉफीसह सन्मानपत्र व २१ लक्ष रुपये धनादेश देऊन सन्मानित करण्यात आले.

या यशाकरिता मुख्याध्यापक तथा गटशिक्षणाधिकारी धनंजय वानखडे यांचे मार्गदर्शनात पर्यवेक्षक श्री परळकर, उपक्रमशील शिक्षक विरेंद्र ब्राम्हण, श्री आंधळे, माधवी पवार, विलास निचित , अतुल कडू , शेषराव मडावी, गजेंद्रसिंह धन्नावत, नितीन लोनाग्रे, प्रफुल होले, श्री बोकडे, श्री. कटकतलवारे, मंगेश मानकर , श्री बाभुळकर, श्री मुधोळकर, श्रीमती गावंडे , श्रीमती राणे, श्रीमती मळसणे,श्रीमती काळमेघ, भावना चव्हाण, वृषाली राऊळकर, पंकज मेंढे, हेमलता राउन व शालेय विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले.

# आधार लिंक नसल्याकारणाने ७५,२११ लाडक्या बहिणींचे पैसे अद्यापही जमा झाले नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती–** जिल्ह्यात लाडकी बहीण योजनेंतर्गत आतापर्यंत ७ लाख १६,९०५ लाडक्या बहिणींनी अर्ज दाखल केले आहेत. यामधून ६ लाख ९९,७१६ अर्ज मंजूर केले तर ७५,२११ लाडक्या बहिणींचे आधार सिडिंग न झाल्याने त्यांचे अद्यापही पैसे जमा झाले नाही.

याशिवाय १०,३३० अर्ज पडताळणीत आहे. अशातच आता मंगळवारी दुपारी विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने या संपूर्ण प्रक्रियेला ब्रेक लागला आहे. त्यामुळे प्रतीक्षेतील महिला लाभार्थ्यांच्या खात्यात २३ नोव्हेंबरनंतरच अनुदान जमा होणार आहे. सोबतच आता नव्याने अर्ज भरण्याच्या प्रक्रिया बंद करण्यात आली आहे.



जिल्ह्यात पहिल्या टप्प्यामध्ये नारीशक्ती ॲपवर ३ लाख ९८,३४१ महिलांनी अर्ज केले होते. त्यानंतर अंगणवाडी सेविकांच्या पोर्टलवरून ३ लाख १०४२ महिलांनी पुन्हा या योजनेकरिता नोंदणी केली आहे. त्यामुळे आतापर्यंत ७ लाख १६,९०५ महिलांनी लाडकी बहीण योजनेकरिता अर्ज केले आहे. यापैकी आतापर्यंत ६ लाख ९९,७१६ महिलांचे अर्ज मंजूर केले आहे. यापैकी ४,३६३ महिलांचे अर्ज फेटाळले आहे. तर १०,३३० हजारांवर अर्ज पडताळणीत आहे. अशातच जिल्ह्यात अद्यापही ७५,२११ महिलांचे आधारकार्ड बँकेला संलग्न नसल्याने त्यांचे अनुदान रखडले आहे. त्यामुळे त्यांचे सिडिंग झाल्यानंतर बँक प्रक्रियेतील अनुदान त्या लाभार्थ्यांना प्राप्त होईल. परंतु, नव्याने अर्ज करणे व पुढील टप्पा याशिवाय त्रुटीत असलेल्या अर्जाची पडताळणी प्रक्रियेला मात्र आचारसंहितेमुळे आता ब्रेक लागला आहे. त्यामुळे आता नवे सरकार स्थापन झाल्यानंतर या योजनेतील अनुदान प्राप्त होईल की योजना बंद होईल. याकडे लक्ष लागणार आहे.

# राज्य प्रकल्प व्यवस्थापनाची भूजल केंद्रास भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती–** अटल भुजल योजनेंर्तगत माहिती शिक्षण व संवाद घटकांतर्गत भूजल माहिती प्रसारण केंद्राला राज्य व्यवस्थापन कक्षातील जलसंधारण तज्ज्ञ रमेश पेटकर यांनी भेट दिली.

अटल भूजल योजनेंतर्गत माहिती शिक्षण व संवाद घटकांतर्गत मोर्शी आणि वरुड तालुक्यातील योजनेत समाविष्ट ग्रामपंचायतीमध्ये भूजल माहिती प्रसारण केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. या केंद्रास पुणे येथील राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्षाचे जलसंधारण तज्ज्ञ रमेश पेटकर यांनी जिल्ह्यातील लेहगाव, ता. मोर्शी आणि धनोडी, ता. वरुड येथील केंद्रास भेट देऊन तपासणी केली. यावेळी जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्षातील माहिती शिक्षण संवाद तज्ज्ञ प्रमोद झगेकर उपस्थित होते.

रमेश पेटकर यांनी ग्रामस्थांना भूजल




केंद्राचा उद्देश समजावून सांगितला. यावेळी त्यांनी भूजलाच्या शाश्वत विकासासाठी ग्रामपातळीवर सक्षम संस्थात्मक व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. याची मुलभूत माहिती असणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत पातळीवर एक स्वतंत्र व्यासपीठाची आवश्यकता असून त्यास चालना देण्यासाठी भूजल माहिती प्रसारण केंद्र चांगले माध्यम आहे. अटल जल योजनेंतर्गत भूजलासंबंधीची माहिती व अहवाल सर्वसामान्यांना खुली करण्यात आली आहे, याचा उपयोग होत असल्याचे सांगितले. प्रमोद झगेकर यांनी नैसर्गिक शेतीचा व कमी खर्चाच्या शेतीचा विचार शेतकऱ्यांनी करणे गरजेच असल्याचे मत व्यक्त केले. नैसर्गिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना योग्य बाजारपेठ मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करण्याबाबत मार्गदर्शन केले.

धनोडीचे सरपंच श्री. आंडे अध्यक्षस्थानी होते. कमलेश अजमिरे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी शरद गोरे, भूपेश बावनकुडे, आशिष गाडबैल, अंकुश पेठ, योगेश यावले, रितेश माटे, विकास सुरोसे आदी उपस्थित होते.

# सेमाडोह बस अपघातातील रुग्णावर सुपर स्पेशालिटीमध्ये फिक्सेशन शस्त्रक्रिया यशस्वी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती**
मेळघाटात १५ दिवसांआधी झालेल्या बस अपघातात जखमी महिला व एका ६ वर्षीय बालिकेवर विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी) येथे मेंडिबल फ्रॅक्चर रिडक्शन, फिक्सेशन शस्त्रक्रिया यशस्वीपणे केली . त्यामुळे या दोन्ही रुग्णांना दिलासा मिळाला असून सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहे. दोघांचीही प्रकृती उत्तम असल्याची माहिती सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलद्वारे दिली . अशी शस्त्रक्रिया प्रथमच केल्याची माहितीही सुपर स्पेशालिटीद्वारे देण्यात आली. दोन्ही रुग्णांना सुपर स्पेशालिटीत आणले त्यावेळी त्यांची प्रकृती चिंताजनक होती मेळघाटात १ ऑक्टोबर रोजी सेमाडोह धारणी मार्गावर खासगी बस नदीत कोसळली होती. यात चार प्रवाशांचा मृत्यू झाला होता. यात २४ पेक्षा जास्त प्रवासी जखमी झाले होते. त्यात ही महिला व ६ वर्षीय बालिकेचा समावेश होता. या दोघींचा रक्तदाब कमी झाला होता. त्यामुळे त्यांना अतिदक्षता विभागात उपचारासाठी दाखल केले होते.दोन्ही रुग्णांची तपासणी केल्यानंतर त्यांच्या जबड्यात फ्रँक्चर असल्याचे दिसून आले. त्यामुळे रुग्णाला वेदना सहन कराव्या लागत होत्या. प्रकृतीही चिंताजनक होती.त्यामुळे या दोन्ही रुग्णांवर सातत्याने लक्ष ठेऊन त्यांची काळजी घेण्यात आली.



त्यांच्या चाचण्या केल्या . या चाचण्यांमध्ये जे शारीरिक दोष आढळले त्यांचे निर्मुलन करावे लागले. त्यानंतर ज्यावेळी या दोन्ही रुग्णांची प्रकृती स्थिर झाली. त्यावेळी त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. सुपर स्पेशालिटीतील शल्य चिकित्सकांनी पहिल्यांदाच अशी शस्त्रक्रिया यशस्वी केली. त्यामुळे शस्त्रक्रियेनंतर डॉक्टरांनी आनंद व्यक्त केला. किचकट शस्त्रक्रिया करण्यासाठी दोन ते तीन तास लागले.

रुग्णाच्या जबड्यात फ्रॅक्चर असल्याने डॉक्टरांनी इन प्लांट केले. ही शस्त्रक्रिया करताना डॉक्टरांना फारच सावधगिरी बाळगावी लागली. यशस्वी शस्त्रक्रियेसह रुग्णाला महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा लाभही देण्यात आला. डॉ. प्रीतिश पडगव्हाणकर, डॉ. भूषण मुंदडा, डॉ. रोहित मुंदडा, डॉ. तरडेजा, डॉ. अंकुश वानखडे, बधिरीकरण तज्ज्ञ डॉ. राखी वानखडे, डॉ. अश्विनी मडावी, डॉ. माधव ढोपरे, डॉ. माधवी कासदेकर व महात्मा ज्योतिबा फुले योजनेचे डॉ. पायल रोकडे, डॉ. दिव्यानी मंदाने, डॉ. श्याम गावंडे यांनी ही शस्त्रक्रीया यशस्वीपणे केली.

# निवडणूक काळात घेण्यात येणाऱ्या परीक्षा पुढे ढकलण्याची विद्यार्थ्यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत घेतल्या जाणाऱ्या नियमित विषम सत्राच्या हिवाळी २०२४ परीक्षा ह्या ११ नोव्हेंबर २०२४ ते २१ नोव्हेंबर २०२४ ह्या दरम्यान होणार आहेत आणि याच दरम्यान महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ पार पडणार आहेत, त्यामुळे त्या १० दिवसात निवडणुकांचा प्रचारांचा धुमाकूळ असणार आहे, प्रचार रॅली, प्रचार सभा भोंग्यांचा आवाज या सर्व घटना होणार आहेत आणि विद्यार्थी सुद्धा सर्व समजाचा, सिस्टिमचा, महाराष्ट्र राज्याचा भाग असल्याने निवडणुकीच्या महोत्सवात सहभागी होतील त्यामुळे साहजिकच या सर्व गोष्टींचा परिणाम हा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणार आहे, या सर्व गोंधळात विद्यार्थी अभ्यास, उजळणी करू शकणार नाही परिणामी त्याचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन आपण विद्यापीठ अंतर्गत घेण्यात येणाऱ्या नियमित विषम सत्राच्या हिवाळी २०२४ परीक्षा ह्या ११ नोव्हेंबर २०२४ ते २१ नोव्हेंबर २०२४ ऐवजी डिसेंबर २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात घेण्यात याव्या अशी मागणी केली.

एलएलबी ३ इयर डिग्री कोर्स च्या दुसऱ्या सत्राचा निकाल २२/०८/२०२४ उशिरा लागल्याने, विद्यार्थ्यांचे प्रवेश उशिरा झाले आणि त्यात अभ्यासक्रमात बदल झाल्याचे परिपत्रक जाहीर केले तोपर्यंत विद्यार्थ्यांनी कोणता अभ्यास करायचा जुना की नवीन हे अधिकृत रित्या विद्यापीठाने जाहीर केलेले नव्हते, त्यामुळे त्या परिपत्रकापसून फक्त ४४ दिवसाचा कालावधी मिळतो त्यात ११ दिवस शासकीय सुट्या आहेत त्यामुळे फक्त ३३ दिवसाचा अतिशय कमी वेळ विद्यार्थ्यांना परीक्षेच्या तयारीसाठी मिळत आहे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन आपण विद्यापीठ अंतर्गत घेण्यात येणाऱ्या नियमित विषम सत्राच्या हिवाळी २०२४ परीक्षा ह्या ११ नोव्हेंबर २०२४ ते २१ नोव्हेंबर २०२४ ऐवजी डिसेंबर २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात घेण्यात याव्या अशी नितिन साहेबराव जामनिक विद्यार्थी प्रतीनिधीने निवेदनाद्वारे मागणी केली.

# देशमुख काका-पुतण्यात जुंपली भगोडा आमदार म्हणत डिवचले

## काटोलात १८ पासून जनसंवाद यात्रा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७काटोल**

विधानसभा निवडणुकीच्या तारखांची घोषणा होताच माजी गृहमंत्री अनिल देशमुख व त्यांचे पुतणे माजी आ. आशीष देशमुख यांच्यात पुन्हा एकदा जुंपली आहे. आशीष हे मागील काळात दिसले नाही. निवडणून जिंकले तेव्हा तीन वर्षात काटोलच्या जनतेला सोडून गेले. भगोडा आमदार अशी आशिष देशमुख यांची ओळख आहे. आता पुन्हा अवतरत आहे, अशा शब्दात अनिल देशमुख यांनी थेट टीका केली.

बुधवारी पत्रकार परिषदेत अनिल देशमुख व सलील



देसमुख यांनी काटोल मतदारसंघात १८ ते २३ ऑक्टोबर दरम्यान जनसंवाद यात्रा काढण्याची घोषणा केली. ही यात्रा व्याहाड ते मोवाड अशी दोन टप्प्यात असेल. शेतकऱ्यांचे प्रश्न, कापूस, पीक विमा, जीएसटीमुळे वाढलेल्या खताच्या किंमती आदी मुद्दे यात्रेदरम्यान जनतेसमोर मांडले जातील. उद्योग गेले, महागाई वाढली, शेतकरी नाराज आहे, याचा बदला लोकसभेप्रमाणे विधानसभेत जनता घेईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मी मतदारसंघात अनेक वर्ष काम केले आहे. पळून गेलो नाही, कोरोनात लोकांची सेवा करण्याचे काम केले, शेतकरी यांच्यासाठी धावून जाण्याचं काम आम्ही केले, असे सलील देशमुख म्हणाले.

# जागा उपलब्ध नसल्याने चांदुर बाजार समितीमध्ये सोयाबीन खरेदी लांबवणीवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७चांदूर बाजार**

शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून शासनाने आधारभूत किंमत योजनांतर्गत नाफेडमार्फत हमीभावाने सोयाबीन खरेदी सुरू करण्याचे आदेश असूनसुद्धा खरेदीच्या अगदी मुहूर्तावर चांदूर बाजार येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारामध्ये जागा उपलब्ध नसल्याचे कारण खरेदी-विक्री संस्थेला देण्यात आले. यामुळे १५ ऑक्टोबरपासून नाफेडमार्फत हमीभावाने सुरू होणारी खरेदी



लांबणीवर पडली. यामुळे शेतकऱ्यांमध्ये बाजार समितीविषयी रोष निर्माण झाला आहे.

बाजार समितीमधील लिलाव शेड, ओटे व अन्य सुविधा शासनाच्या अनुदानामधूनच निर्माण करण्यात आल्या आहेत. यापूर्वी नाफेडची हमीभावाने तूर, चणा खरेदी ही बाजार समितीच्या आवारातच सुरू होती. परंतु, या वर्षीच सोयाबीनच्या खरेदीला जागा उपलब्ध नसल्याचे कारण बाजार समितीतर्फे दिले गेले. यासंदर्भात बाजारसमिती सचिवांनी खरेदी-विक्री संस्थेला लेखी पत्र दिले. खरेदी-विक्री संस्थेकडे तालुक्यातून २०० शेतकऱ्यांची आजपर्यंत नोंदणी अर्ज प्राप्त झाले. त्यांची ऑनलाइन प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान,राज्यात बहुतांश ठिकाणी नाफेडची खरेदी बाजार समितीच्या आवारातच सुरू आहे. मग चांदूर बाजार येथील बाजार समितीला या खरेदीचे वावडे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.


> शेतकऱ्यांचे धान्य ठेवण्याकरिता नकार नाहीं, मात्र जागा उपलब्ध नसेल तर ते कुठे ठेवायचे, हा प्रश्न आहे. सध्या बाजारात समितीमध्ये मोठ्या प्रमाणात सोयाबीन आवक आहे. खरेदी-विक्री संस्थेचेच तीन मोठे गोडाउन असताना त्याचा वापर का केला जात नाही, हा प्रश्नच आहे.
>
> **सतीश मोहोड, संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती**

# सीताबाई संगई कन्या शाळेला १५ लाखांचे पारितोषिक

## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात विभागातून दुसरा क्रमांक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अंजनगावसुर्जी**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या शासनाच्या अभियानांतर्गत येथील सीताबाई संगई कन्या शाळेला अकोला, यवतमाळ, बुलढाणा, अमरावती आणि वाशिम या पाच जिल्ह्याच्या विभागातून द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे व शाळेला १५ लक्ष रुपयाचे पारितोषिक मिळाले याबाबत पुरस्कार प्रदान समारंभ अतिशय थाटामाटात जमशेद भाभा थिएटर, नॅशनल परफॉर्मिंग सेंटर फॉर आर्टस् ,नरीमन पॉईंट, मुंबई येथे पार पडला शाळेच्या या यशाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.गेल्या काही महिन्यांपासून शालेय गुणवत्ता वृद्धीसाठी महाराष्ट्र राज्य स्तरावर सुरू असलेल्या



मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा २ अंतर्गत विविध शाळांचे वेगवेगळ्या निकषनिहाय झालेल्या सर्वेक्षणामध्ये अनुक्रमे तालुकास्तर, जिल्हास्तर पार करत येथील सीताबाई संगई कन्या शाळेने विभागीय स्तरावर अकोला, यवतमाळ, बुलढाणा, अमरावती, वाशिम या पाचही जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे. हा पुरस्कार प्रदान समारंभ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रमुख उपस्थितीत व विधानसभा अध्यक्ष ड.राहूल नार्वेकर यांचे अध्यक्षतेखाली तसेच शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर,कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा,खासदार अरविंद सावंत,आमदार जगन्नाथ अभ्यंकर, शिक्षण आयुक्त सूरज मांढरे,शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती आय.ए. कुंदन यांच्या उपस्थितीत दि. १४ ऑक्टोबर रोजी मुंबई येथे संपन्न झाला.मान्यवरांच्या हस्ते सीताबाई संगई कन्या शाळेला पारितोषिकाच्या स्वरूपात सन्मानचिन्ह, १५ लाख रुपयांचा धनादेश आणि प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.याप्रसंगी सीताबाई संगई एज्यु. सोसायटीचे अध्यक्ष अविनाश संगई व उपाध्यक्ष डॉ. उल्हास संगई तथा सीताबाई संगई कन्या शाळेचे मुख्याध्यापक उत्तम मुरकुटे व ज्येष्ठ शिक्षक अमोल डहाळे, अमरावती चे शिक्षण उपसंचालक डॉ. शिवलिंग पटवे, माध्यमिक च्या शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख, गटशिक्षणाधिकारी भटेसिंगजी गिरासे कार्यक्रम स्थळी पुरस्कार स्वीकारण्यास प्रत्यक्ष हजर होते. शाळेचे व्यवस्थापक मंडळ, शिक्षक, शिक्षिका, कर्मचारी वर्ग, विद्यार्थिनी तथा पालक वर्ग यांनी पुरस्कार सोहळ्याला युट्युबच्या माध्यमातून आभासी स्वरूपात हजेरी लावली व आनंद व्यक्त केला शाळेतील कार्यरत संपूर्ण शिक्षक वृंद, कर्मचारी वर्ग व विद्यार्थिनी यांनी घेतलेल्या अथक परिश्रमाबद्दल सर्वच स्तरातून शाळेचे कौतुक होत आहे.

# वैद्यकीय जैविक कचरा गोकुळढुसा कॉलनीतील रस्त्यावर : कॉलनीतील नागरिकांनी केली तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अंजनगाव सुर्जी**

शहरातील एका खाजगी दवाखान्यातील रुग्णांकरिता वापरलेल्या सुई सलाईन आणि सलाईनच्या ट्यूब वायर असा नागरी आरोग्यास घातक असलेला वैद्यकीय जैविक कचरा शहरातील प्रतिष्ठित नागरिक रहिवाशी असलेल्या गोकुळढुसा कॉलनीमध्ये खुल्या जागेवर टाकल्या जात असलेला प्रकार घडला असून कॉलिनितील नागरिकांनी याबाबत तक्रारी केल्या आहेत.सदर वैद्यकीय जैविक कचरा हा मानवी आरोग्याला घातक असल्याने याच्या संकलनासाठी वेगळी व्यवस्था केली असते दवाखान्यातून एका बंद वाहनद्वारे याचे संकलन होत असते असे असताना असा कचरा हा रस्त्याच्या कडेला असलेल्या कचऱ्याच्या धिगाऱ्या प्रमाणे या कॉलीनीत टाकल्या जात आहे यामध्ये वैद्यकीय टाकावू साहित्यासह क्लिनिकच्या चिठ्ठ्या सुद्धा मोठ्या प्रमाणात आढळल्या असून त्यावर फातिमा क्लिनिक असे नाव दिसून आले नागरिकांनी तक्रारी केल्या असून नगर पालिकेकडून हा कचरा उचलण्यात आला परंतु नगरपरिषद याबाबत कारवाई ची



> वैद्यकीय जैविक कचरा सार्वजनिक ठिकाणी टाकने अयोग्य असून पालिकेच्या घनकचरा संकलनात सुद्धा तो संकलित केल्या जात नाही त्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असते झालेल्या प्रकारचा पंचनामा व चौकशी करण्यात येत असून संबंधितांवर नोटीस बजावून दंडात्मक कारवाई करण्यात येईल
>
> **मिलिंद वानखडे**
> **अभियंता पाणी पुरवठा व स्वच्छ्ता विभागनगर परिषद अंजनगावसुर्जी**

काय भूमिका घेते यावर कॉलनीतील नागरिकांचे लक्ष लागले आहे विशेष करून पंचनामांमध्ये फातिमा क्लिनिक रुग्णालयाच्या चिठ्ठ्या आढळून आल्याचे दिसले असल्याचे बोलले जात आहे ही नागरी आरोग्याच्या दृष्टीने गंभीर बाब असून प्रशासनाने यावर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

# दोन नोडल अधिकारी बदलले : स्वीपचे कैलास घोडके यांची बदली : सीईओंकडे येणार जबाबदारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि १७अमरावती**

निवडणूक विभागाने लोकसभेतील नोडल अधिकारी कायम ठेवत जुलैच्या शेवटच्या आठवड्यात नोडल अधिकाऱ्यांची यादी जाहीर केली होती. परंतु या यादीतून खर्च आणि स्वीप या दोन नोडल अधिकारी बदलले आहेत. एकाची बदली झाली असून एक अधिकारी सेवानिवृत्त झाले आहेत. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने आधीच तयारी सुरू केली आहे. लोकसभेच्या निवडणुकीत नियुक्त केलेल्या १६ नोडल अधिकाऱ्यांना विधानसभेतही पुनर्रनियुक्ती देण्यात आली आहे. त्यांची यादी जुलैच्या शेवटच्या आठवड्यात जाहीर करण्यात आली. परंतु यामध्ये खर्च नोडल अधिकारी म्हणून असलेले जिल्हा परिषदेचे तत्कालिन वित्त व मुख्य लेखाधिकारी चंद्रशेखर खंडारे ३१ जुलैला रोजी सेवानिवृत्त झाले. त्यामुळे त्यांच्या जागी मुख्य लेखाधिकारी विजय देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली होती. परंतु स्वीपची जबाबदारी महिला व बाल विकास विभाग जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी कैलास घोडके यांच्याकडे असताना मंगळवारी त्यांच्या बदलीचे देखील आदेश धडकले. त्यामुळे आता त्यांच्याऐवजी कुणाला जबाबदारी द्यावी, असा प्रश्न निर्माण झाला आहे. परंतु यापूर्वी लोकसभेमध्ये आणि यापूर्वीच्या निवडणुकीत देखील सीईओ यांच्याकडेच स्वीपची जबाबदारी असल्याने सीईओ संजिता महापात्र यांच्याकडे ही जबाबदारी येण्याची शक्यता आहे.

# जुलै २०२४ सत्रापासून सुरू झालेल्या इग्नो अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रियेस ३१ ऑक्टोबर पर्यंत मुदतवाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्लीच्या अमरावती येथील अभ्यास केंद्राअंतर्गत जुलै २०२४ पासून सुरू झालेल्या विविध पदवी (सेमिस्टर पद्धतीचे अभ्यासक्रम वगळून), पदव्युत्तर (PG ), पदव्युत्तर पदविका ( PG Diplom ), पदविका ( Diploma ) अभ्यासक्रमासाठी नवीन प्रवेशाची अंतिम तारीख ३१ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे. सदर



अभ्यासक्रमांकरिता इग्नोच्या www.ignou.ac.in वेबसाईटवरून तसेच https://ignouadmission.samarth.edu.in/ ह्या लिंकवरून अर्ज सादर करता येईल. सविस्तर माहितीपुस्तिका व ऑनलाईन अर्ज कसा सादर करावा याबाबतची माहिती इग्नोचे उपरोक्त वेबसाईटवर उपलब्ध आहे. अधिक माहितीकरिता इच्छुकांनी इग्नोचे अभ्यासकेंद्र, मुलींचे वसतीगृहाजवळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसर येथे सकाळी ८.३० ते १०.३० या वेळात संपर्क साधावा असे डॉ.वर्षा नाठार, समन्वयक, इग्नो अभ्यासकेंद्र, अमरावती यांनी कळविले आहे.

# १९ ला तृतीयपंथीयांची जनजागृती पदयात्रा : समर्पण ट्रस्ट चे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ अमरावती**

समर्पण ट्रस्ट लैगिंक आरोग्य संस्था गेल्या १२ वर्षांपासून अमरावती जिल्ह्यात समलैंगिक तसेच तृतीयपंथीयांकरिता तसेच त्यांच्या आरोग्याविषयी माहिती देण्याचे काम करते. १९ ऑक्टोबरला वॉल्क फॉर फ्रीडम या दिवसाचे औचित्य साधून नेहरु मैदान येथे रॅलीचे आयोजन केले आहे. दुपारी ३ वाजता नेहरु मैदान येथून रॅली निघणार असून ३०० पेक्षा अधिक तृतीयपंथी त्यात सहभागी होणार असल्याची माहिती महामंडलेश्वर जूना आखाडा उज्जैन पीठ व समर्पण ट्रस्टच्या अध्यक्षा मां पवित्रा नंदगिरी यांनी दिली.

त्या म्हणल्यात की समाजात वावरताना त्यांना समाजाकडून सापत्नपणाची वागणूक




मिळते. आम्हाला मान नको सन्मान द्या, याकरिता ही जनजागृती पदयात्रा काढण्यात येणार आहे. शासनासोबत लढलो तेव्हा सन २०१४ मध्ये तृतीयपंथियांना मतदानाचा अधिकार मिळाला. सरकारकडून देण्यात येणाऱ्या सुविधा मिळविण्यासाठी आम्ही लढा देत आहो.मात्र समाजाकडून जशी सामान्यांना वागणूक दिली जाते, तशी वागणुक मिळत नसल्याने आम्ही नोकरी करु शकत नाही.

अन्यथा तृतीयपंथियांना सुध्दा लग्नात, रस्त्याने भीक मागायची वेळ आली नसती. अमरावती जिल्ह्यात ९ हजार तृतीयपंथी - आह्ेत. त्यांच्या आरोग्याकडे कुणीच लक्ष्य देत नाही. त्यामुळे समर्पण ट्रस्टच्या माध्यमातून त्यांच्या आरोग्यासोबतच शासकीय योजनेचा लाभ मिळून देण्याचे कार्य केले जाते. त्याच संदर्भात नेहरु मैदान येथून रॅलीचे आयोजन केले आहे. या पदयात्रेमध्ये कुठल्याही प्रकारची नारेबाजी केली जाणार नाही. आम्हाला मान नको सम्मान द्या असे पोस्टर बॅनर घेऊन शांततेच्या मार्गाने पदयात्रा काढण्यात येईल, असे त्यांनी यावेळी सांगितले. पत्रकार परिषदेमध्ये आचल चव्हाण, यश चौधरी उपस्थित होते.

# आ.सौ. सुलभाताई खोडके यांच्या जनआशीर्वाद यात्रेला झंझावाती सुरुवात

## नवसारी प्रभागवासियांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, थेट गृहभेटीतून जनतेशी संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

गेल्या पाच वर्षांपासून अमरावतीकर जनता विकासाचे पर्व अनुभवत आहे. पायाभूत विकास व मानवविकासातून शहराच्या शाश्वत विकासाला बळकटी मिळाली असून विविध विकास योजनांतून स्थानिकांचे जीवनमान देखील उंचावले आहे. अमरावती विधानसभा मतदार संघाच्या विकासासाठी भरीव निधी उपलब्ध झाल्याने अनेक विकासकामे व जनतेच्या जिव्हाळ्याचे प्रश्न मार्गी लागले आहे. अमरावतीमध्ये झालेल्या विकास कामांच्या जोरावर व शहराच्या विकासाला बळकटी, गती व नवी दिशा देण्याकरिता एक व्हिजन व नियोजित कृती कार्यक्रम घेऊन अमरावती विधानसभा मतदार संघाच्या लोकप्रिय आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके या येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी होऊ घातलेल्या



अमरावती विधानसभेच्या निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या आहेत. या निवडणुकीत जनतेची बहुमोल साथ व आशीर्वाद लाभावे, म्हणून सुलभाताईंनी मतदार संघात झंझावाती जनआशीर्वाद यात्रा आरंभिली आहे. बुधवार दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वाजता जवाहर नगर त्रिमूर्ती भक्तिधाम मंदिर येथून आ.सौ.सुलभाताई खोडके यांच्या जनआशीर्वाद यात्रेला मोठ्या धुमधडाक्यात सुरुवात झाली. सर्व प्रथम फटाक्याच्या अतिषबाजीत व ढोल ताश्यांच्या गजरात सौ.सुलभाताई खोडके यांचे स्वागत करण्यात आले. या दरम्यान नवसारी भाग, जवाहर नगर, रेखा कॉलनी, निशिगंधा कॉलनी, अरुण कॉलनी, कौशिक विहार, कल्पना नगर, सुशांत कॉलनी, आदी भागातून जनआशीर्वाद यात्रेने भ्रमण केले असता सुलभाताईंनी स्थानिक परिसरवासियांच्या घरोघरी जाऊन थेट भेट थेट संवादातून त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी महिलांनी त्यांचे औक्षण करून स्वागत केले. गत काळात विकास कामांची पूर्तता झाल्याने नवसारी भागातील परिसराला नवी चकाकी आली आहे. परिसराचा कायापालट झाल्याने सर्वत्र विकासाचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे या निवडणुकीतही आमची तुम्हालाच साथ राहणार असल्याची कृतज्ञता स्थानिक नागरिकांच्या वतीने व्यक्त करण्यात आली.जनतेची मिळणारी साथ, विश्वास व आशीर्वाद, हीच आपली काम करण्याची ऊर्जा असून आपल्या सर्व सहकारी स्नेहीजनांना विश्वासात घेऊन आपण निवडणुकीला सामोरे जात आहे. गेल्या पाच वर्षात जनतेच्या अपेक्षेनुरूप विकास कामांना प्राधान्य दिले. मात्र अमरावती शहर झपाट्याने वाढत असतांना अजून बरीचशी कामे करायची आहे. यासाठीचा नियोजित कृती कार्यक्रम आगामी काळात पूर्णत्वास आणण्याचा आपला मनोदय आहे. त्यामुळे निवडणुकीत सुद्धा मतदानरुपी आशीर्वाद द्यावा, असे आवाहन सौ. सुलभाताई खोडके यांच्या वतीने करण्यात आले. दरम्यान सौ. सुलभाताई खोडके यांनी परिसरातील धार्मिक ठिकाणी भेट देऊन श्रीचे कृपाशिर्वाद घेतले.यावेळी सुलभाताईंच्या पदयात्रेत मोठा जनसमुदाय एकवटला होता. याप्रसंगी सुलभाताईंनी घरोघरी जाऊन जनतेचे आशीर्वाद घेत त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी काहींच्या वतीने निवेदन सुद्धा देण्यात आले असता आगामी काळात या निवेदनांची दखल घेऊन यथाशीघ्र पूर्तता करण्यात येणार असल्याचे आश्वासन सुद्धा सुलभाताईंच्या वतीने देण्यात आले. यावेळी स्थानिक नागरिकांनी सौ.सुलभाताई खोडके तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है.. अशा गगनभेदी घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला. आ. सौ. सुलभाताई खोडके यांच्या पहिल्याच जनआशीर्वाद यात्रेला स्थानिक नवसारी प्रभागवासियांचा भरभरून प्रतिसाद लाभल्याने अमरावतीच्या विकासासाठी सौ. सुलभाताई खोडके नावाचं वादळ आलंय, असे चित्र यावेळी उमटले होते. यावेळी स्थानिक भागातील नागरिक, महिला भगिनी, जेष्ठ मंडळी तसेच सर्व सहकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# इच्छुकांकडून लॉबिंग सुरू : आचारसंहिता लागताच उमेदवारीसाठी धावाधाव

## विद्यमान आमदारांना तिकीट मिळणार की टाळणार?

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेची घोषणा होताच इच्छुकांनी पक्षश्रेष्ठींचे उंबरठे झिजविणे सुरू केले असून कुठल्याही परिस्थितीत उमेदवारी आपल्यालाच मिळावी यासाठी जोरदार प्रयत्न सुरू आहेत.

महायुती व महाविकास आघाडीच्या वाटाघाटीत कोणता मतदारसंघ कोणाला सुटतो व उमेदवारी कोणाला मिळते, याची उत्सुकता वाढली आहे. दरम्यान, अमरावती जिल्ह्यातील विद्यमान आमदारांना तिकीट मिळणार की टाळणार, याकडेही सर्वांच्या नजरा आहेत. सध्या जिल्ह्यात काँगेस कडे तीन विद्यमान आमदार होते मात्र त्यापैकी दर्यापूर मतदार संघातील आमदार हे खासदार म्हणून निवडून आले आहेत तर अमरावतीच्या काँग्रेस च्या आमदार सुलभा खोडके यांना पक्षातून निलंबित करण्यात आले आहे.तर तिवसा मतदार




संघातून यशोमती ठाकूर यांची उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात आहे.अचलपूर मतदार संघातून प्रहारचे बच्चू कडू हे निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.तर त्यांच्याच पक्षाच्या उमेदवार म्हणून मेळघाट मधून विद्यमान आमदार राजकुमार पटेल यांनी प्रहार पक्षाला रामराम केल्यामुळे त्यांना आता कोणत्या पक्षाकडून तिकीट मिळणार या कडे सर्वांचे लक्ष लागले आहे.मोर्शी वरुड विधानसभा मतदार संघातून स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या तिकिटावर निवडून आलेले विद्यमान आमदार देवेंद्र भुयार यांना आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाकडून तिकीट मिळण्याची शक्यता आहे मात्र त्यांना महायुती मध्ये प्रचंड विरोध आहे.त्यामुळे भुयार यांना कोणत्या पक्षाकडून तिकीट मिळते हे बघावे लागणार.धामणगाव रेल्वे मतदार संघातून विद्यमान आमदार प्रताप अडसड यांची उमेदवारी जवळपास निश्चित मानल्या जात आहे.भाजपा कडून अडसड पुन्हा निवडणुकीच्या मैदानात उतरणार असल्याचे चित्र मतदार संघात पहावयास मिळत आहे.बडनेरा मतदार संघातून महायुती चे घटक पक्ष असलेले युवा स्वाभिमानाचे विद्यमान आ रवी राणा हे निवडणूक लढणार असल्याचे ते स्वतः सांगत असले तरी भाजप मधून त्यांना प्रचंड विरोध आहे.ते भाजप चा विरोध शांत करण्यात यशस्वी होतात का?हे बघणे औसुक्याचे ठरणार आहे.

प्रचाराच्या गाड्या वेगात, पण तिकिटाचे काय ?उमेदवारी गृहित धरून अमरावती जिल्ह्यात काही जणांनी प्रचार सुरू केला आहे. काहींनी जनसंवाद यात्रा काढल्या आहेत तर काही नेत्यांच्या प्रचाराच्या गाड्या सुसाट धावत आहेत. पण तिकिटाचे काय, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# ३९ पथकांद्वारे जिल्ह्याच्या सीमा 'सील'

## जिल्हास्तरीय ६१ भरारी पथकासह ३२ व्हिडीओ पथकांचीही राहणार नजर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

विधानसभा निवडणुकीचीआचारसंहिता मंगळवारी दुपारपासून लागु करण्यात आली आहे. या निवडणुकीदरम्यान कोणतीही अनुचित घटना घडु नये याकरीता जिल्हा व पोलिस प्रशासन सज्ज झाले आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या सिमा सिल करण्यात आल्या असून तेथे ३९ ठिकाणी नाकाबंदी लावण्यात आली आहे. याशिवाय संपुर्ण निवडणुक प्रक्रियेवर लक्ष ठेवण्याकरीता ६१ भरारी पथक व ३२ व्हिडीओ पथक तैणात करण्यात आले आहे.



राज्यात विधानसभेची निवडणुक जाहीर करण्यात आली आहे. २० नोव्हेंबरला मतदान तर २३ ला मतमोजणी होणार आहे. याकरीता जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून आचारसंहीतेचे उल्लघंन होवु नये याकरीता विविध पथक गठीत करण्यात आले आहे. जिल्हाबाहेरून दारूसाठा, पैशांची नेआण होवु नये याकरीता जिल्ह्याच्या सिमांवर नाकाबंदी लावण्यात आली आहे. अशा आठ मतदार संघात ३९ एसएसटी पथक गठीत करण्यात आले आहे. यामध्ये मोर्शी विधानसभा मतदार संघात सर्वाधिक ९ ठिकाणी नाकाबंदी लावण्यात आली आहे. याशिवाय धामणगाव रेल्वे मतदार संघात सहा पथक, बडनेरा ४, तिवसा ४, दर्यापुर ५, अचलपुर ३ व मेळघाट मतदार संघामध्ये ४ पथक गठीत केले आहे. अशा ३९ पथकाव्दारे जिल्ह्याची सिमा लॉक करण्यात आली आहे. याशिवाय जिल्हास्तरावर ६१ भरारी पथक देखील तैणात राहणार आहे. या पथकाव्दारे निवडणुकीवर लक्ष दिले जाणार आहे. सोबतच व्हिडीओ व व्हिव्हिटी असे १४५ पथक गठीत केले आहे.

### आज पथकांचे प्रशिक्षण

जिल्ह्यात गठीत करण्यात आलेल्या एसएसटी, एफएसटी, व्हिएसटी, व्हिव्हिटी आदी १४५ पथकांतील सदस्यांना नियोजन भवन येथे गुरुवारी सकाळी १० ते १.३० वाजता दरम्यान प्रशिक्षण देण्यात आले आहे.

# विधानसभेची तिकीट कोणाला मिळेल गा भाऊ ? चावडीवरील चर्चांना ऊत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती १३**

मंगळवारी सायंकाळपासून आचारसंहिता घोषित करण्यात आली. आचारसंहिता घोषित होताच विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले असून चावडीवर बसणाऱ्या नागरिकांनी निवडणुकीसंबंधात विविध चर्चांना सुरुवात केली आहे. त्या चर्चेअंतर्गतच अचलपूर मतदार संघातून भाजपाची विधानसभेची तिकीट कोणाला मिळेल गा भाऊ,



असा सूर उमटताना दिसून येत आहे. मंगळवारपासून आचारसंहिता घोषित झाली असून विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. आचारसंहिता घोषित होण्यापूर्वी विविध पक्षाच्या संभाव्य उमेदवारांनी मीच विधानसभेचा उमेदवार म्हणून प्रचाराला सुरुवात केली होती. विधानसभा क्षेत्रात ठिकठिकाणीविविध सण उत्सवांच्या शुभेच्छा देणारे बॅनर लावून आपणच उमेदवार असल्याचे भासविले होते.

दरम्यान, मंगळवारपासून आचारसंहितेची अंमलबजावणी सुरू झाली. त्यानुसार मंगळवारी रात्रीपर्यंत अचलपूर विधानसभा क्षेत्रात असलेल्या तालुक्यातील राजकीय पुढाऱ्यांचे होर्डिंग काढण्यात आले. तथापि, सध्या सोयाबीन कापणीचा हंगाम सुरू असून बहुतांश नागरिक शेतशिवारात तर काही नागरिक गावातील चावडीवर बसल्याचे दिसून येतात. आता निवडणुकीची उमेदवारी कोणत्या पक्षाकडून कोणाला मिळते व कोण अपक्ष म्हणून निवडणूक रिंगणात उभे राहणार, याविषयीच्या चर्चांना ऊत आला आहे.

# आज गुरुकुंजात किर्तनकारांची मांदियाळी

## दोन दिवस राज्यातील विविध किर्तनकारांचा गजर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७गुरुकुंज आश्रम**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५६ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्य श्रीगुरुदेव वारकरी कीर्तन संमेलन आयोजित करण्यात आले असून यामध्ये राज्यातील विविध किर्तनकार सहभागी होणार आहे. या संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मणदास काळे राहणार असून उद्घाटक रामायणाचार्य संजय पाचपोर तसेच प्रमुख अतिथी म्हणून पदमाकर देशमुख, प्रा.निलेश पर्वत, मधुकर भोसले. प्रमुख मार्गदर्शक संदीप गिऱ्हे, डॉ. प्रशांत ठाकरे, कैलास चव्हाण व प्रमुख उपस्थिती रामचंद्र कांडलकर, उपसर्वाधिकारी दामोदर पाटील, प्रचार प्रमुख प्रकाश वाघ, प्रमोद जाणे तसेच समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष संचालक सुरेंद्र भूयार, प्रमुख अतिथी चंदेलेनाना (जोग महाराज शिक्षण संस्था आळंदी देवाची), पुरुषोत्तम मोरे (तुकाराम महाराज संस्थान देहू), प्रमुख मार्गदर्शन सचिनदादा पवार (संपादक वारकरी दर्पण पुणे), प्रमुख उपस्थिती सर्वाधिकारी लक्ष्मण गमे, सरचिटणीस जनार्दन बोथे, समन्वयक रमेश ढवळे, लक्ष्मण





लटपटे. या कीर्तन संमेलनात नागेश आगलावे (बुलढाणा) ऋशिकेश मानमोडे (अमरावती), कैलास वाघाये (गोंदिया), बाळू डाके (यवतमाळ), सुश्री तेजस्वनी पाठक (मलकापूर), सुश्री अनुपमा पिंपळकर (यवतमाळ), सुरेश अढाव (संभाजी नगर), ज्ञानेश्वर मुंडे (लातूर), मारोती कोंढाळ (परभणी), आकाश वानखडे (वर्धा), गणेश सोनोने (बिड), ऋषिकेश पाटील (धुळे), सुश्री गौरी विटोले (नागपूर), गजानन जुनगडे (जालना), मंगेश वऱ्हाडे (बुलढाणा), दत्तात्रय माशेरे (खेड पूणे), दिपक भोयरी (रायगड), पांडूरंग चांदर (आळंदी), सुश्री समिक्षा चव्हाण (नाशिक), वैभव मेंगळे (पुणे) इत्यादी किर्तनकार या कीर्तनकार संमेलनात सहभागी होणार आहे. आजचे कार्यक्रमशुक्रवार, १८/१०/२०२४सकाळी ५.३० ते ६.३० : सामुदायिक ध्यान व चिंतन : संदीप गिहेसकाळी ७ ते ८ : योगासन व प्राणायामसकाळी ८ ते ९: ग्रामगीता प्रवचन विजय ठाकरेसकाळी ९.०० ते १०.०० : अभंग वाणी कु. श्रावणी भडकेसकाळी १० ते ५ : श्रीगुरुदेव वारकरी कीर्तन संमेलन गुरुकुंज वारीसायंकाळी ६ ते ७ : सामुदायिक प्रार्थना व चिंतन – प्रा. सुभाष लोहेरात्री ७ ते ८ : अभंगवाणी श्रीकांत काठोळेरात्री ८ ते १० : श्रीगुरुदेव वारकरी कीर्तन संमेलन गुरुकुंज वारी

# जिल्हाधिकाऱ्यांनी आचारसंहितेचे दिलेत कडक अंमलबजावणी करण्याचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

जिल्ह्यात महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. संपूर्ण निवडणूक कालावधीत आदर्श आचारसंहितेचे यथायोग्य पालन करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत प्रशासनाने निर्देश दिले आहेत. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी






आचारसंहितेची कडक अंमलबजावणी करण्याचे निर्देश प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिले आहेत.

शासकीय कार्यालये, विश्रामगृहे आदी परिसरात मिरवणुका काढण्यास, घोषणा देणे, सभा घेणे आदींवर निर्बंध आहेत. शासकीय, निमशासकीय सार्वजनिक मालमत्तेचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरूपात विद्रुपीकरण करता येणार नाही. तसे आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येणार आहे.उमेदवारांचे नामनिर्देशन दाखल करताना ताफ्यामध्ये तीनपेक्षा जास्त मोटारगाड्या, वाहने तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचे १०० मीटर परिसरात व दालनात ५ व्यक्तींव्यतिरिक्त कोणालाही प्रवेश करण्यास निर्बंध राहणार आहे. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतइतर उमेदवारांचे नाव व चिन्ह वापरणे, आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे बंधनकारक आहे.

### दहापेक्षा अधिक वाहन ताफ्यांवर बंदी

निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत खासगी व्यक्तींच्या जागेवर, सार्वजनिक जागेवर झेंडे, भित्तीपत्रके जागा मालकाच्या व संबंधित प्राधिकरणाच्या परवानगी– शिवाय लावता येणार नाही. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत प्रचार, रॅली, रोड–शो याकरिता वाहनाच्या ताफ्यात १० पेक्षा अधिक मोटार गाड्या वापरता येणार नाहीत.

### मोर्चा, उपोषणावर निर्बंध

निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचे २०० मीटर परिसरात धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषणे करण्यावर निर्बंध आहे. धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणच्या जवळपास तात्पुरते पक्ष कार्यालय स्थापन करता येणार नाही. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत जात, धर्म, भाषावार शिबिरांचे आयोजन करण्यावर निर्बंध आहे. निवडणुकीच्या प्रचाराकरिता निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनावर पक्ष प्रचाराचे कापडी फलक, झेंडे लावणे आदी बाबींवर निर्बंध आहे.